उमरगा जिल्हा उस्मानाबाद येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक:- बीएलडी २०१८/प्र. क्र.१०/ई-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ जुलै, २०१९.

संदर्भ:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. बीएलडी-४३०९/२००७/प्र.क्र.२२५/ई-८, दि.२५/०८/२००९

२) विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र..२०१७/ मशाका-२/ भ्रनिस/तक्रार/कावि १०५२, दि.०३/११/२०१७.

प्रस्तावना:-

उमरगा जिल्हा उस्मानाबाद येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या रु.२१४.६४ लाख इतक्या रकमेच्या अंदाजपत्रक व नकाशास शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. बीएलडी-४३०९/२००७/प्र.क्र.२२५/ई-८, दि.२५/०८/२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. आता विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी संदर्भ क्र. २ येथील दि.०३/११/२०१७ च्या पत्रान्वये सदर इमारतीच्या कामामध्ये भाववाढ, अतिरिक्त बाबी, जादा दराची निविदा स्विकृती (११.२०%) व आकस्मिक खर्च इ. कारणामुळे झालेल्या रकमेच्या वाढीचा समावेश करुन रु.२६०.९८ लाख इतक्या खर्चाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकांस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उमरगा जिल्हा उस्मानाबाद येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामाचे अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांची तांत्रिक मान्यता प्राप्त असलेले सुधारित अंदाजपत्रक सन २०१०-११ च्या जिल्हा दर सुचीवर आधारित आहे. या अंदाजपत्रकांची सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तपासणी केली असून, त्यास अनुलक्षून सोबतच्या सहपत्र -अ॰ अनुसार रु. २,६०,९१,७५४ लाख (रुपये दोन कोटी साठ लाख एक्क्याण्णव हजार सातशे चोपन्न फक्त) च्या खर्चास शासन सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

२. प्रस्तावित बांधकामावरील पुर्वी दिलेल्या आर्थिक अनुदानाची रक्कम वगळून अधिकचा खर्च लेखाशिर्ष “मागणी क्रमांक एच-८ ४०५९ - सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१, बांधकाम (०७) जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) ५३, मोठी बांधकामे (०७)(०१) मोठी बांधकामे (४०५९ ०७९९) (०७) (०२) आस्थापना खर्च (४०५९ ०८०५) (०७)(०३) हत्यारे व संयंत्र यांचा खर्च (४०५९ ०८१४)” या उद्दिष्टाखालील अर्थसंकल्पीय अनुदानामधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र. सं.क्र.७६/इमा-३ दि.०९/०२/२०१८ व वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१९/२०१९/व्यय-९, दि.१४/०१/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार तसेच वित्त विभागाचे पत्र क्र. व्यअस-२०१९/प्र.क्र.२९/अर्थ-२, दि. १२जून, २०१९ सोबतच्या कार्यवृत्तानुसार दि.१ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत व्यय अग्रक्रम समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०७३११५१४२८७३१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Manisha Anil Rane

Digitally signed by Manisha Anil Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3ae05f3b600583f9600d8b04b6e849927430597b482376d876288748f5e12a0a, cn=Manisha Anil Rane
Date: 2019.07.31 15:24:07 +05'30'

(मनिषा राणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
२. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.
३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.
५. तहसीलदार, उमरगा, जि.उस्मानाबाद.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा - उस्मानाबाद .
७. उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. उप सचिव, वित्त विभाग, कार्यासन- व्यय-९, मंत्रालय, मुंबई-३२.
९. निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मुंबई-३२.

(शासन निर्णय क्र. बीएलडी-२०१८/प्र.क्र.१०/ई-८, दि. १९ जुलै, २०१९ चे सहपत्र)

"सहपत्र-अ"

Name of Work: Revised Estimate of Tahshil Office Building at Omerga Dist. Osmanabad.

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars	Cost (Rs.)
1)	Building Proper	-
	Area of Building	-
	Rate of construction Rs./Sqm	-
	Cost of construction	1,84,91,693.00
2)	Electrification	-
	a) External (Transformer,MSEB Charges, DG Sets, Street Light etc.)	10,00,000.00
	b) Internal (5%)	-
3)	EIRL,FRP Dome	9,01,967.00
4)	Land Development	3,60,000.00
5)	Price Escalation	22,81,968.00
6)	Above Tender	21,22,126.00
7)	Contigencies (4%)	9,34,000.00
	Total Rs.	**2,60,91,754.00**

Say Rs. 260.92 lakh